# प्रेसनोट दि. २८/०७/२०१८

## फंड ट्रान्सफर करण्याचा बहाणा दाखवून आर्थिक फसवणुक करणारा दिल्ली येथे राहणारा नागरिक सायबर क्राईम सेलच्या जाळ्यात.

ऑनलाईन अथवा फोनव्दारे विवीध कंपनीचे फंड / पॉलीसीची मुदत संपलेली असून तुमच्या अकाऊंटवर पैसे जमा करण्यास भाग पाडून अनेक नागरिकांकडून पैसे उकळण्याच्या प्रकारामध्ये वाढ होत आहे. गुन्ह्यातील फिर्यादी यांना अज्ञात इसमाने फोन करून पब्लीक फंड ट्रान्झेक्शन डिपार्टमेन्ट दिल्ली मधून बोलत आहे सांगितले तसेच फिर्यादी यांचा फंड जमा झालेला तो बँक अकाऊंटवर ट्रांन्सफर करून देतो असे सांगून फिर्यादी यांना रक्कम रु. ३९,३६,३०४/- जमा करण्यास भाग पाडले. फिर्यादी यांना कोणत्याही प्रकारचा फंड जमा न झाल्याने त्यांची आर्थिक फसवणूक झाली असल्याने सांगवी पोलीस ठाणे गु.रं.नं. २२८/२०१८, भा.द.वि. कलम ४१९,४२० सह माहिती तंत्रज्ञान सुधारित कायदा २००८ चे कलम ६६ डी, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

यातील फिर्यादी यांनी सायबर क्राईम सेल येथे झालेल्या आर्थिक फसवणूकीबाबत तक्रार केली होती. दाखल गुन्ह्याचा समांतर तपास हा सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखा करीत असून सायबर सेलच्या पथकाने त्वरीत संबधित मोबाईल कंपनी व बँक यांना पत्रव्यवहार करून त्यांचेकडून माहिती प्राप्त केली. मोबाईल कंपनी व बँकेकडून प्राप्त माहितीचा तांत्रिक अभ्यास करून आरोपी हा दिल्ली येथे असल्याचे निष्पन्न केले. त्या अनुशंगाने मा. पोलीस आयुक्त, आ.व.सा., यांच्या परवानगीने दिल्ली येथे पथक रवाना करण्यात आले. सदर ठिकाणी जावून आरोपी नामे - रमनकुमार झा, पत्ता- हाऊस नं ६७, कृष्णा गली, रामलिला मैदान, सरिता विहार, दिल्ली. येथून यांना ताब्यात घेतले. त्याच्याकडुन ०१ मोबाईल हॅन्डसेट, ०१ डेबीट कार्ड हे जप्त करण्यात आले आहे. सदर आरोपींस ताब्यात घेवून पुढील कारवाईसाठी सांगवी पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही श्री. सुधीर हिरेमठ, पोलीस उप आयुक्त,आ.व.सा., गुन्हे, मा. सहा.पोलीस आयुक्त, आ.व.सा., गुन्हे, निलेश मोरे, मा. व.पो.नि. राधिका फडके, यांचे मार्गदर्शना खाली पो.उप.नि. मंदा नेवसे, किरण औटी पोलीस कर्मचारी- शिरीष गावडे, योगेश वाव्हळ, अतुल लोखंडे, ज्योती दिवाणे यांच्या पथकाने केली आहे.

याद्वारे पुणे शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अशा विवीध कंपनीचें फंड ट्रन्सफर करून देतो असे सागून फोन करणाऱ्या इसमांची अथवा कंपनीची पडताळणी करूनच पैसे जमा करावेत तसेच खात्री केल्याशिवाय स्वतःची वैयक्तिक माहिती देवू नये त्याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी. तसेच असा कोणताही प्रकार लक्षात आल्यास जवळचे पोलीस स्टेशनशी अथवा सायबर क्राईम सेल विभागाशी संपर्क साधावा.

प्रेसनोट दि. २८/०७/२०१८

**ऑनलाईन फेसबुक द्वारे मैत्री करुन गिफ्ट पाठवण्याचे बहान्याने आर्थिक फसवणूक करणारा नायझेरीयन नागरिक सायबर क्राईम सेलच्या जाळ्यात.**

ऑनलाईन फेसबुक वर मैत्रि करुन गिफ्ट पाठवण्याचे अमिष दाखवून अकाऊंटवर पैसे जमा करण्यास भाग पाडून अनेक नागरिकांकडून पैसे उकळण्याच्या प्रकारामध्ये वाढ होत आहे. फिर्यादी या खाजगी हॉटेल मध्ये नोकरी करत असून मागील दिड वर्षापासून फेसबुक वर अज्ञात इसमाशी फिर्यादी यांची ओळख झाली नंतर त्यांचे मध्ये फेसबुक वर चॅटींग करुन मैत्रि झाली. मे.२०१८ मध्ये अज्ञात इसमाने फिर्यादी यांना पार्सलचे फोटो वॉटसअप वरती पाठवले त्यानंतर एक आढवडयानंतर फिर्यादी यांना फोन करुन दिल्ली एअरपोर्ट ऑफिसमधुन प्रिया शर्मा नावाने बोलत असून तुम्हचे कुरीअर सोडवण्यासाठी खात्यावर पैसे भरावयास सांगितले तसेच सदर पार्सल मध्ये परदेशी चलन असल्याचे सांगून फिर्यादी यांना रक्कम रु. १,१७,०००/- जमा करण्यास भाग पाडले. फिर्यादी यांना कोणत्याही प्रकारचे पार्सल न मिळाल्याने त्यांची आर्थिक फसवणूक झाली असल्याने वानवडी पोलीस ठाणे गु.रं.नं. २८६/२०१८, भा.द.वि. कलम ४१९,४२० सह माहिती तंत्रज्ञान सुधारित कायदा २००८ चे कलम ६६ डी. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

यातील फिर्यादी यांनी सायबर क्राईम सेल येथे झालेल्या आर्थिक फसवणूकीबाबत तक्रार केली होती. दाखल गुन्ह्याचा समांतर तपास हा सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखा करीत असून सायबर सेलच्या पथकाने त्वरीत संबधित मोबाईल कंपनी व बँक यांना पत्रव्यवहार करून त्यांचेकडून माहिती प्राप्त केली. मोबाईल कंपनी व बँकेकडून प्राप्त माहितीचा तांत्रिक अभ्यास करून आरोपी हा दिल्ली येथे असल्याचे निष्पन्न केले. त्या अनुशंगाने मा. पोलीस आयुक्त, आ.व.सा., यांच्या परवानगीने दिल्ली येथे पथक रवाना करण्यात आले. सदर ठिकाणी जावून आरोपी नामे – **Atse Serge,** नायजेरीयन वय- ३० वर्ष मूळ पत्ता-तुरा मेघालय, सध्याचा पत्ता- मोहन गार्डन, उत्तमनगर, दिल्ली. येथून यांना ताब्यात घेतले. त्याच्याकडुन १७ मोबाईल हॅन्डसेट, ०७ सिमकार्ड , ०६ डेबीट कार्ड, ०४ पासबुक, ०१ चेकबुक हे जप्त करण्यात आले आहे. सदर आरोपींस ताब्यात घेवून पुढील कारवाईसाठी वानवडी पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही श्री. सुधीर हिरेमठ, पोलीस उप आयुक्त,आ.व.सा., गुन्हे, मा. सहा.पोलीस आयुक्त, आ.व.सा., गुन्हे, निलेश मोरे, मा. व.पो.नि. राधिका फडके, यांचे मार्गदर्शना खाली पो.उप.नि., किरण औटी, नितीन खामगळ पोलीस कर्मचारी- शिरीष गावडे, प्रसाद पोतदार, अतुल लोखंडे, जाबा, यांच्या पथकाने केली आहे.

याद्वारे पुणे शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अशा फेसबुक वरुन मित्री करण्याऱ्या व फोन करणाऱ्या इसमांची पडताळणी करूनच पैसे जमा करावेत तसेच खात्री केल्याशिवाय स्वतःची वैयक्तिक माहिती देवू नये त्याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी तसेच असा कोणताही प्रकार लक्षात आल्यास जवळचे पोलीस स्टेशनशी अथवा सायबर क्राईम सेल विभागाशी संपर्क साधावा.